**<u>ठळक बातम्या</u>**

- महायुतीचं ९९ टक्के जागावाटप निश्चित, गुरुवारी जागावाटप आणि उमेदवार जाहीर होणार असल्याची अजित पवारांची घोषणा

- महाविकास आघाडीच्या जागावाटपावर चर्चा सुरू, वंचित बहुजन आघाडी उद्या निर्णय जाहीर करणार

- लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा उद्या अखेरचा दिवस, चंद्रपुरातून सुधीर मुनगंटीवार, गडचिरोलीतून अशोक नेते यांचा अर्ज दाखल

**आणि**

- मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडून अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघातली पोटनिवडणूक रद्द

**<><><><><>**

महायुतीचं ९९ टक्के जागावाटप निश्चित झालं असून गुरुवारी जागावाटप आणि उमेदवार यादी जाहीर होईल. यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पत्रकार परिषद घेणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. रायगडमधून प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हेच महायुतीचे उमेदवार असतील अशी घोषणाही त्यांनी केली. पक्षाच्या आमदार आणि मंत्र्यांची बैठक घेतल्यानंतर ते पुण्यात पत्रकार परिषदेत बोलत होते. राष्ट्रवादीने महादेव जानकरांना पाठिंबा दिला ही विरोधकांनी पसरवलेली अफवा असल्याचं सांगत बारामतीचा उमेदवार बदलणार नाही असं अजित पवारांनी स्पष्ट केलं.

आजच्या पुण्यातल्या बैठकीत बारामती, शिरूर, सातारा, उस्मानाबाद, नाशिक, रायगडआणि परभणी लोकसभा मतदारसंघांविषयी चर्चा झाल्याची त्यांनी सांगितलं.

शिवसेनेचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी संध्याकाळी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यावेळी अजित पवार, सुनिल तटकरे, दिलीप वळसे-पाटील यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उपस्थित होते. यावेळी अजित पवार यांनी आढळराव पाटील यांना शिरुरमधून उमेदवारी जाहीर केली.

**<><><><><>**

महाविकास आघाडीच्या जागा वाटपात दोन जागांवर अजून निर्णय झालेला नाही, त्यावर चर्चेतून लवकरच मार्ग निघेल, असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज सांगितलं. ते नागपुरात बातमीदारांशी बोलत होते. आघाडीचा धर्म सर्वांनीच पाळला पाहिजे. सांगली आणि भिवंडी या काँग्रेसच्या परंपरागत जागा आहेत, या जागांवर काँग्रेसकडे चांगले उमेदवार आहेत. सांगलीत जे झालं ते बरोबर नाही, असं ते म्हणाले.

वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांच्या प्रस्तावासाठी काँग्रेसने एक पाऊल पुढे टाकले आहे. आता शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी तो प्रस्ताव मान्य करावा असं आवाहन पटोले यांनी केलं.

वंचित बहुजन आघाडीसोबत चर्चा अजूनही सुरू आहे, असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, प्रकाश आंबेडकर यांनी चांगला प्रस्ताव दिला तर त्याचा विचार करु असा दावा एकनाथ शिंदें सोबत असलेले आमदार संजय शिरसाठ यांनी केला आहे.

**<><><><><>**

वंचित बहुजन आघाडीचा लोकसभा निवडणुकीच्या संदर्भातला निर्णय आज संध्याकाळी राज्य कार्यकारणीच्या बैठकीत ठरणार आहे. वंचित बहुजन आघाडीचे मुख्य प्रवक्ते सिद्धार्थ मोकळे यांनी समाजमाध्यमांवर ही माहिती दिली आहे. आजच्या बैठकीत होणारा निर्णय पक्षाचे अध्यक्ष ॲड प्रकाश आंबेडकर उद्या अकोल्यातून जाहीर करतील, असं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी सोलापूर मध्य मतदारसंघ मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला सोडावी, अशी मागणी माकपचे माजी आमदार नरसय्या आडम यांनी केली आहे. ती मान्य झाली तर लोकसभा निवडणुकीसाठी सोलापूर लोकसभा मतदारसंघात आम्ही काँग्रेस उमेदवाराचा प्रचार करु, असं त्यांनी म्हटलं आहे. भाजपा हा आमचा मुख्य विरोधक आहे. त्यांना हरवण्यासाठी आम्ही महाविकास आघाडीला साथ देऊ, असं नरसय्या आडम यांनी स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

गडचिरोली-चिमूर मतदारसंघात काँग्रेसचे नामदेव किरसान निवडणूक लढवणार आहेत. किरसान यांच्या उमेदवारीमुळे नाराज होऊन माजी आमदार आणि गेल्यावेळेचे लोकसभेचे काँग्रेसचे उमेदवार डॉ.नामदेव उसेंडी यांनी आज आदिवासी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. त्यानंतर संध्याकाळी त्यांनी नागपूरात प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत भाजपामध्ये प्रवेश केला.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा उद्या अखेरचा दिवस आहे. यामुळे विदर्भात अर्ज प्रक्रियेला वेग आला आहे. या पहिल्या टप्प्यात राज्यातल्या नागपूर, रामटेक, चंद्रपूर, भंडारा-गोंदिया, आणि गडचिरोली-चिमूर या पाच लोकसभा मतदारसंघांचा समावेश असून, इथल्या उमेदवारांच्या नावांची घोषणा भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेसनं केली आहे. या जागांसाठी १९ एप्रिलला मतदान होणार आहे

चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातून वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी भाजपाचे उमेदवार म्हणून आज अर्ज दाखल केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांच्यासह अनेक नेते, कार्यकर्ते मुनगंटीवार यांना पाठिंबा दर्शवण्यासाठी सोबत आले होते. अर्ज करण्यापूर्वी मुनगंटीवार यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करीत जाहीर सभाही घेतली.

गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघात भाजपाचे अशोक महादेवराव नेते यांनीही आज उमेदवारी अर्ज दाखल केला. बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पक्षातर्फे बारीकराव धर्माजी मडावी यांनीही अर्ज दाखल केला. या मतदारसंघातून आतापर्यंत ४ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत.

**<><><><><>**

अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघातली पोटनिवडणूक मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर पीठानं आज रद्द केली. भाजपा आमदार गोवर्धन शर्मा यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या या जागेसाठी १६ मार्चला पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली. त्याविरोधात अनिल दुबे यांनी जनहित याचिका दाखल केला होती. या पोटनिवडणुकीत निवडून येणाऱ्या उमेदवाराला पुरेसा कालावधी मिळत नसल्याचा

मुद्दा त्यांनी मांडला. नवीन सदस्याला निवडून आल्यावर फक्त चार महिन्याचा कालावधी मिळणार होता. नियमानं तो कमीतकमी सहा महिने मिळायला हवा. हे मान्य करत न्यायालयानं ही पोटनिवडणूक रद्द केली.

**<><><><>**

विविध राज्यांमधून येणाऱ्या एकाच स्वरूपाच्या तक्रारींबद्दल निवडणूक अधिकारी वेगवेगळ्या पद्धतीनं प्रतिसाद देत असल्याच्या मुद्द्यावरुन आज भाजपानं निवडणूक आयोगाकडे धाव घेतली. अश्विनी वैष्णव आणि विनोद तावडे या नेत्यांसह आज भाजपा शिष्टमंडळानंं नवी दिल्लीत आयोगाची भेट घेतली आणि हा मुद्दा मांडला. कथित आक्षेपार्ह वक्तव्यांबद्दल भाजपाच्या नेत्या आणि केंद्रीय मंत्री शोभा कारंदलाजे यांच्यावर कारवाई झाली मात्र त्याचं प्रकारचं वक्तव्य तमिळनाडूच्या मंत्र्यानं केलं असताना त्याच्यावर काहीच कारवाई झाली नाही, हे उदाहरण यावेळी भाजपा नेत्यांनी दिलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याविषयी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी काढलेल्या अवमानजनक वक्तव्याचा मुद्दाही आयोगाच्या निदर्शनाला आणून दिल्याचं तावडे यांनी बैठकीनंतर वार्ताहरांना सांगितलं. निवडणूक प्रक्रियेला वेग आला असताना अशा प्रकारच्या वक्तव्यांवर निवडणूक आयोगानं नियंत्रण ठेवावं, अशी विनंती भाजपानं केल्याचं तावडे म्हणाले.

**<><><><>**

राज्यात लोकसभा निवडणुकीत कामगार, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदानाच्या दिवशी भरपगारी सुट्टी मिळणार आहे. याबाबतचं परिपत्रक राज्य शासनानं जारी केलं आहे.

अपवादात्मक परिस्थितीत पूर्ण दिवस सुट्टी देणं शक्य नसेल तर, कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी कमीत कमी दोन तासांची सवलत दिली जाईल. मात्र त्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची परवानगी घेणं आवश्यक आहे.

सुट्टी अथवा सवलत न मिळाल्यानं मतदान करता करता आलं नसल्याची तक्रार मतदारांकडून आली तर संबंधितावर कारवाई केली जाईल, असं या परिपत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज चेन्नई सुपर किंग्ज आणि गुजरात टायटन्स यांच्यात सामना होत आहे.

थोड्याच वेळात म्हणजे साडेसात वाजता चेन्नईतल्या एम ए चिंदबरम स्टेडिअमवर हा सामना सुरु होईल. गुजरात टायटन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

विद्यापीठ अनुदान आयोगानं CUET-UG - 2024 या परीक्षेसाठी अर्ज भरण्याची मुदत ३१ मार्चपर्यंत वाढवली आहे. अनेक विद्यार्थी आणि इतरांकडून विनंती आल्यानं हा निर्णय घेतल्याचं आयोगानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

विदर्भात तुरळक ठिकाणी उद्यापर्यंत पाऊस किंवा मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी काल कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली आहे तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी किमान तापमानात

सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली. अकोला इथं ४१ अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली आहे. येत्या दोन दिवसांत राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता असल्याचं म्हटलं आहे.

//<><><><><>//